INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# बळीच्या शोकात्म अवस्थेचे अस्सल चित्रण

**डॉ. संजयकुमार कोळी**
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग,
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे
**E-mail:** Sanjaykumar.koli@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/11.2021-97624989/IRJHIS2111026

**प्रस्तावना :**

राजन गवस हे अलीकडील चार दशकापासून लेखन करणारे महत्त्वाचे लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी विविध साहित्यप्रकार हाताळले. त्यात प्रामुख्याने चौंडकं (१९८५), भंडारभोग (१९८९), धिंगाणा (१९९१), कळप ( १९९७), तणकट (१९९९), ब- बळीचा (२०१२), रिवणावायली मुंगी (२००१), आपण माणसात जमा नाही (२००८), ढव आणि लख्ख ऊन (२०१०), हुंदका (१९८२), काचाकवड्या (२००६), कैफियत (२०१०),लोकल ते ग्लोबल (२०१९),भाऊ पाध्ये यांची कादंबरी (२००६),भाऊ पाध्ये यांची कथा (२०१०), रोकडे पाझर (२०१०), तृतीयपंथीयांची बोली, लैंगिक लोककथाचा मानसशास्त्रीय अभ्यास, तिरकसपणातील सरळता (१९८५), चांगदेव चतुष्टयासंबंधी (२०००), अव्यक्त माणसांच्या कथा, अशा विविध साहित्य प्रकारातून राजन गवस समाजाबद्दलचे परखड चिंतन व्यक्त करत आहेत. तसेच त्यांच्या ब-बळीच्या कादंबरीने तर कृषि संस्कृतीचा एकूण पटच मांडला आहे. ही कादंबरी अनेक प्रयोगांच्या शक्यतेथून कृषीजन संस्कृतीचा आलेख उभा करते.

भारत हा देश कृषीप्रधान संस्कृती असलेला देश असं म्हटलं जातं. स्वातंत्र्यपूर्व काळ असो किंवा स्वातंत्र्योत्तर काळ असो. देशातील शेतकऱ्याची अवस्था थोडी बदलली असेलही, परंतु त्याचे प्रश्न आणि अडचणी मात्र आहे त्याच आहेत. स्वातंत्र्यपूर्व अवस्था आपण समजून घेऊ शकतो. कारण पारतंत्र्यातील कुठलीही अवस्था ही दमणकारी वा शोषणमूल्यांवरच आधारित असते. त्यामुळे तो झगडाच मुळात स्वातंत्र्यासाठी असतो . तिथले प्रश्न हे इतके प्रचंड असतात की आपण त्यासाठी प्रत्येक पातळीवर व्यक्ती, समूह, संघटना यांच्या पातळीवर लढत असतो. दुसऱ्या कुणाची तरी आपल्यावर सत्ता असणं हीच बाब कितीतरी क्लेशदायक असते. सतत व्यक्तीला त्याच्या गुलाम असण्याची जाणीव होत राहते. त्याच्या आत तो बंडाची गोष्ट मग सतत कार्यरत होऊ पाहते. तो त्यासाठी आक्रमक होतो. कधी शस्त्रास्त्रांच्या सहाय्याने तर कधी आंदोलने, मोर्चे, असहकार या अहिंसक मार्गानी तो आपली लढाई लढत

राहतो ही लढाई प्रत्यक्ष असते. कारण, त्याचा शत्रू कुणीही अज्ञात नसून तो समोर उभा असतो आणि तो सरळसरळ शोषण करणारा असतो. त्यामुळे पारतंत्र्यात असणं ही गोष्ट त्या दृष्टीने सर्वांना संघटित पातळीवर एक करणारी असते. आणि लढाईचं स्वरूप कळणारी असते. तिथे स्वातंत्र्य मिळविण्याचे उद्देश अधिक प्रबळ असतात. मग त्यासाठी कुठल्याही पद्धतीचे मरण पत्करण्याची व्यक्तींची तयारी असते . त्यासाठीच ते परकीयांविरुद्ध लढाई उभी करतात. ही झाली स्वातंत्र्यपूर्व कालखंडाची गोष्ट, भारत देश तेव्हाही जवळजवळ पूर्णतः शेती व्यवसायावरच अवलंबून होता.

स्वातंत्र्यानंतर जे काही औद्योगिकीकरण किंवा विज्ञान तंत्रज्ञानाच्या बळावर जे बदल झाले. त्यातून बरीचशी लोकसंख्या शेतीवरील भार कमी करून शहराकडे स्थलांतरित झाली. भारतीय स्वातंत्र्यलढा असो किंवा इतर कोणत्याही देशाचा स्वातंत्र्यलढा असो. त्यांचा उद्देश अराजक, गुलामी, पारतंत्र्य यांच्या विरोधात उभे राहून स्वातंत्र्य मिळवणे हाच असतो. कारण स्वातंत्र्य किवा स्वराज्य म्हणजे स्वतःच राज्य होय. या राज्यात पारतंत्र्यातून मिळणाऱ्या किंवा भोगाव्या लागणाऱ्या ज्या काही हाल अपेष्टा होत्या त्या आता संपतील व नव्या जीवनाला सुरुवात होईल. या आशावादाखातर अनेक लोक या स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेले असतात. सर्वसामान्य माणसांचा आशावाद खरोखरच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खरा ठरतो का ? आणि त्यात भारत तर शेतीप्रधान देश. या देशाची अर्थव्यवस्था प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे येथील शेतकऱ्यांच्याच खांद्यावर असते. मराठी साहित्यातले महत्त्वाचे लेखक राजन गवस यांच्या ‘ब – बळीचा’ या कादंबरीतून सध्याच्या शेतकऱ्याची अवस्था खूप सत्यान्वेषी अंगाने त्यांनी मांडलेली आहे . त्या संदर्भातून आपल्याला त्या कादंबरीकडे पाहणे गरजेचे ठरते.

राजन गवस यांची कादंबरी केवळ सरधोपट पद्धतीने ही केवळ एक कादंबरी आहे असे आपण येथे म्हणू शकत नाहीत. अशोक बाबर म्हणतात, "गवस यांनी कोणकेरीची डायरी आणि त्यांच्या नोंदीवरून नवमध्यमवर्ग कसा स्वार्थासाठी भ्रष्टाचारी बनून शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत असंवेदनशील झालेला आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या रेट्यात बहुजन समाज भौतिक सुखाकडे पाहण्यात कसा गर्क झाला आहे. हे गवस यांनी चित्रीत करताना स्पष्ट केले आहे की, भारतीय नवमध्यमवर्ग हा प्रतिक्रांतीच्याच दिशेने धावतो आहे आणि शेतकरीच काय तो खरा क्रांतिकारी वर्ग बनवू शकतो."[१] त्यांच्या कादंबरीतून दिसून येते, त्यात पत्रे आहेत, कथेच्या आत अनेक कथा आहेत, डायऱ्या आहेत. ग्रामीण समाज, बहुजन जीवन, त्यात येणाऱ्या सर्वसामान्य व्यक्ती, राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व्यवस्था या सगळ्यांमध्ये भरडला जाणारा शेतकरी समाज याची सगळी गोष्ट ही कादंबरी आपल्यापुढे उभी करते. या कादंबरीतले दिपूशेठ कोणकेरी, आडव्याप्पा ही सगळी पात्रे आपल्या सभोवताली असलेल्या अनेक प्रश्न आणि समस्यांचा गुंता सोडवण्यात मग्न आहेत. या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, तिला अनेक सुरूवात आहे आणि निश्चित शेवट नाही. शेतकऱ्याच्या जीवनाविषयीचा गुंता ही कादंबरी आपल्यापुढे ठेवते. स्वातंत्र्यानंतर सर्वसामान्य व्यक्तींनी पाहिलेली स्वप्ने किंवा महापुरुषांनी या लोकांसाठी उभा केलेला लढा आता नेमका कुठल्या पातळीवर उभा आहे . त्याची अवस्था काय आहे ? शेतकरी संघटना, चळवळी, आंदोलने यांची नेमकी स्थिती काय आहे ? त्यातून काय साध्य झाले ? अशा अनेक प्रश्नांचा उहापोह या कादंबरीत आलेला आहे.

शेतकरी प्रश्न अगदी महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, म. गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इतर

अनेक महापुरूषांनी त्यांच्या काळात शेतकऱ्यांचे प्रश्न अगदी पोटतिडकीने मांडले. मग त्या संदर्भातील आंदोलने, चळवळी, परिषदा, लढे किंवा केलेले लेखन असेल त्याचं काय झालं ? किवा त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात ज्या काही शेतकरी संघटना उभ्या राहिल्या त्यातून काय निष्पन्न झाले ? या सगळयाची महत्त्वाची चर्चा या कादंबरीत राजन गवस यांनी केलेली आहे.

महात्मा फुल्यांसारख्या क्रांतिकार समाजसुधारकाने जे काही महत्त्वाचे प्रश्न शेतकरी अथवा बहुजन समाजाच्या हितासाठी मांडले किवा ज्या चळवळी त्यांनी उभ्या केल्या. त्याचे आजचे फलित काय आहे ? शेतकऱ्याचा आसूड सारखा महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी सत्यशोधक समाजाची चळवळ उभी केली असताना लिहिला. शेतकरी हिताची कितीतरी मोठी गोष्ट त्यांनी त्या काळात लिहिली. हंटर कमिशन आयोगापुढे त्यांनी शेतकऱ्याच्या एकूण परिस्थितीची दारूण गोष्ट ब्रिटिशांची कोणतीही भीडभाड न ठेवता मांडली. त्या गोष्टीला आज दीडशेहून अधिक वर्षे उलटून गेली. एवढ्या वर्षांत शेतकऱ्यांची अवस्था काय झालो आहे ! ती सुधारली की त्याच्यात काही परितवर्तन होऊन प्रगती झालीय की आणखी काही. उलट महाराष्ट्रासारख्या राज्यात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या. महात्मा गांधींनी नीळ उत्पादक शेतकऱ्यांचा यशस्वी केलेला लढा असो किंवा महर्षी शिंदे यांनी विविध परिषदांच्या माध्यमातून शेतकन्यांच्या स्थितीविषयी मांडलेले वा लिहिलेले विचार असो. त्यांचं आजचं स्वरूप काय आहे ? तर ते अत्यंत नकारात्मक असच आहे. राजन गवस त्यांच्या 'ब – बळीचा' या कादंबरीतून या सर्वांची चर्चा करतात. आणि ते आजच्या समकालीन शेतकऱ्याच्या अवस्थेबद्दल अत्यंत चपखलपणे लागू होते.

'ब - बळीचा' या कादंबरीची संरचना राजन गवस यांच्या या आधी लिहिलेल्या कादंबऱ्यांपेक्षा अत्यंत वेगळी अशीच आहे. या कादंरीचे एकूण कादबंदी अंतर्गत तीन कथाभाग येतात. या कादंबरीबदल नितीन रिंढे म्हणतात, "या कादंबरीतली गोष्ट नेमकी आहे कोणाची ? एका भांडीविक्याने घेतलेल्या एका लेखकाच्या शोधाची की भांड्यांवर नावं घालणान्या लेखकाची ? लेखकाने लिहिलेल्या सिनेमाच्या पटकथेची की त्या पटकथेत न मावणान्या शेतकऱ्याची ? जोतीराव फुल्यांच्या स्वप्नभंगाची की दिवसेंदिवस स्वार्थी - आत्मकेंद्री विखंडित होत, चाललेल्या समकालीन समाजाची ? की या सगळयांचीच ? सांगणं अवघड आहे. पण ही केवळ गोष्ट नाही एवढं निश्चित."[२] या कादंबरीला अनेक आरंभ आहेत, पण शेवट नाही. 'कथांतर्गत कथा' अशी रचना असलेल्या या कादंबरीत डायऱ्या आहेत, पत्र आहेत, पटकथाही आहे. कादंबरीतले दिपूशेठ, कोणकेरी, आडव्याप्पा ही सगळीच पात्रं आपापल्या भोवतालाचा गुंता सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. झपाट्याने नागर होत चाललेल्या ग्रामीण - बहुजन समाजाविषयीचा, त्यातल्या व्यक्ती आणि कुटुंबाविषयीचा हा गुंता आहे. नागरीकरणाच्या वामनी पावलाने समाजाच्या तळाशी गाडल्या गेलेल्या शेतकऱ्याच्या जीवनाविषयीचा हा गुंता आहे. वाजतगाजत सुरू असलेल्या नागरीकरणाची नेमकी दिशा कोणती ? ती आपल्याला कुठं घेऊन जाणार आहे ? अशा कळीच्या प्रश्नांचा हा गुंताळा आहे. ही कादंबरी वाचणं म्हणजे प्रश्नांच्या गुंताळयात गुरफटत जाणं. वाचकाची त्यातून सुटका नाही आणि कादंबरीला शेवट नाही. अशी एकूण कादंबरी संदर्भातली मांडणी दिसून येते.

अर्थात दिपूशेठने कोणकेरी या लेखकाचा घेतलेला शोध , कोणकेरीने त्याच्या डायरीत केलेल्या नोंदी तसेच

म.फुल्यांना व कांतारामजींना लिहिलेली पत्रे, आणि लेखक कोणकरीने चित्रपटासाठी लिहिलेल्या पटकथेतील आडव्याप्पा शेतकरी अशा तीन भागात ही कादंबरी उलगडत जाते. या कादंबरीला एकच एक असा नायक नाही. दिपूशेट, कोणकेरी आणि आडव्याप्पा असे तीन नायक या कादंबरीला आहेत. या तिघांच्या तीन स्वतंत्र कथा आहेत. या तिन्ही कथांच्या माध्यमातून 'ब - बळीचा' ही कादंबरी आकाराला येते महेंद्र कदम म्हणतात, "प्रयोगाच्या विविध शक्यतामुळे कादंबरी विविध पातळयांवर वावरू शकली आहे, अनेक अशी यांचे पदर तिला स्वतःमध्ये मुरवता आले आहेत. एक व्यापक आशय मांडणारी आणि तत्त्वज्ञानाच्या दिशेने जाणारी ही कादंबरी आहे."[३] यातून लक्षात येते की, एकूण शेतकरी आणि त्याच्या अवतीभवतीची समाजव्यवस्था लेखक आपल्यासमोर उभी करतो. हे तीन नायक जरी वेगवेगळे असले, तरीही ते एकमेकांशी या ना त्या अर्थाने जोडलेले आहेच. अप्रत्यक्ष पातळीवर किंवा कादंरबरीच्या सूत्राचा जो उद्देश आहे. त्याला हे तिघेही चपखलपणे धरून ठेवतात. या अर्थाने या कादंबरीचे वेगळेपण आपल्याला येथे नमूद करावे वाटते. या तिघांचाही शोध वेगवेगळा आहे. येथे लेखक कोणकेरी अचानक गायब होतो. दिपूशेठसाठी ते अत्यंत अडचणीचं ठरत जातं. या पोलिसांच्या ससेमिऱ्यातून सुटण्यासाठी दिपूशेठ कोणकेरीचा शोध घेत असतो. आणि कोणकेरीची आस्था मात्र शेती आणि शेतकरी या दोघांशी असते. कारण, कोणकेरीने एका चित्रपटासाठी पटकथा लिहिलेली असते. ती कथा आडव्याप्पा या शेतकऱ्याची असते. त्या कादंबरी वाचता वाचता पटकथेतील काही निवडक दृश्ये येत जातात. त्या मागोमाग कोणकेरीच्या डायरीतील काही पानं, त्याने केलेल्या नोंदी येतात . अस्वस्थ होऊन जोतिराव व कांतारामजींना लिहिलेली पत्रे येतात. खरंतर दिपूशेठ व कोणकेरी या दोघांच्या माध्यमातून लेखकाना समकालीन काळातील जी काही व्यवस्था इथे आकाराला येतेय किंवा आलीय त्यावरच भाष्य करायचं आहे. शेती आणि तिची झालेली वाईट अवस्था यांच्या माध्यमातून जे चित्रण लेखक उभे करतो ते अस्वस्थ करणारं असच आहे.

या वरील तिन्ही गोष्टी एकमेकांशी संबंधित अशाच असल्याने कादंबरीत जरी वेगवेगळ्या पातळीवर नायक उभे राहत असले, तरीही वाचकाला त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध तसे लक्षात येत जातात. खरं तर पुढारी, प्रशासन व्यवस्था आणि या सर्वांशी हितसंबंध जपणारा भांडवलदार अशी एक साखळीच भारतीय शेती व्यवसायाला कशी उद्ध्वस्त करत आहे. याचे चित्रण लेखकाने या तीन गोष्टींच्या माध्यमातून कादंबरीच्या आधारे मांडले आहे. यात जी काही पटकथा येते त्यातून आडव्याप्प्या या शेतकऱ्याची अत्यंत करूण कहाणी आपल्यासमोर उभी राहते. नेते, प्रशासक आणि भांडवलदार यांच्या अत्यंत विकृत युतीतून येथील पर्यावरण, शेती, निसर्ग किंवा जो काही सभोवताल आहे, तो कसा अशांत झाला आहे, आणि त्यामुळे या आजच्या काळातील शेतकरी या तिघांच्या तावडीत कसा सापडला आहे. याचे चित्रण या कादंबरीत येते. तसेच आसाराम लोमटे म्हणतात, "सदैव राजकारणात गिरक्या घेणारे आणि सर्वसामान्यांना जगताना भोवंडून टाकणारे गावपातळीवरील सत्तेच्या पटावरचे मोहरे, त्यांच्या हालचाली, मूल्यांना पायदळी तुडवून चाललेले त्यांचे सत्ताध डावपेच यांचे अतिशय सूक्ष्म आणि भरघोस अशा तपशिलांनिशी ही कादंबरी दर्शन घडविते."[४] त्यातून दिपूशेठचा लेखकाचा शोध, कोणकेरीची पटकथा आणि जोतिराव व कांतारामजींना लिहिलेली पत्रे यांचा अंतर्भाव वेळोवेळी कादंबरीत होत जातो. या सगळया व्यवस्थेला अधोरेखित

करण्याचे काम आडव्यायाच्या शोकात्म कथेच्या माध्यमातून लेखक करत जातो. गावगाडा आणि त्यात असलेल्या काही चांगल्या गोष्टी या तिघांच्या अभद्र युतीतून हळूहळू निसटून जात आहेत.

जागतिकीकरणाच्या आगमनानंतर जी काही नवभांडवली व्यवस्था आकाराला आली, ती केवळ श्वापदासारखी सर्वसामान्य व्यक्तीला खातच सुटली. तिचा पायाच मुळात विकृती आहे. या व्यवस्थेबद्दल लेखकाचा रोष प्रकट होत जातो. आणि लेखकाला 'ब - बळीचा' या कादंबरीच्या माध्यमातून नेमकी कुठली व्यथा मांडायची आहे. ते लक्षात येते आणि ही लेखकाची मांडणीही तेवढीच सशक्तपणे वाचकांच्या समोर आणण्यात लेखक यशस्वी होतो. इथे एके ठिकाणी नोंदी घेताना एका ज्ञानी महाराजांच्या सेंद्रिय शेतीच्या तत्त्वज्ञानाबद्दल नोंद घेतल्यानंतर एक स्वगत येते. गाव बदलण्याच्या उद्देशाने काहीतरी गोष्टी मांडल्या जातात. आत्ताचं खेड नष्ट करायला हवय. नव उभं करायला हवय. आताचं पोखरलय वगैरे. कोणकेरीच्या नोंदीतील हे स्वगत आपल्याला जणू कादंबरीचा गाव पोखरल्याचा सारच सांगून जातं. "चावडीची झाली फावडी, फावड्यानं लुटा, लुटायला बसलेले, लुटायला टपलेले, लुटारूच्या टोळया. टोळयांच्या पुन्हा टोळया. गल्लीत टोळया. दिल्लीत टोळया. टोळयांची गोंडस नावं. टोळया प्रसिद्ध करतात अजिंठा. लुटीचा अजिंठा. कसं लुटू कुठं लुटू लुटण्याचं वेळापत्रक. वेळापत्रकानुसार लुटीचा जाहीरनामा. कोणी म्हणतं वचननामा. लुटीचं वचन. वचनावर चालणाऱ्या गावाला लुटीचा वचननामा. कोण देतं वचन. लुटारूचा थिंक टैंक लुटा लुटा एक एक बंक. आता बँक संपली. योजनांची लुटालूट. महालूट की महालूत. बघता बघता ह्या गल्ल्या. हे गाव, हा तालुका हा जिल्हा, हे राज्य लूत भरल्या अंगानं विव्हळ फिरतं आहे. लुटारूच्या वल्गनेत. खंगत खंगत. "(ब-बळीचा,पृ.१२३) पुढे मध्यरात्रीचे दृश्य सुरू होतं.

एकूण वरील नोंदीतील स्वगतानुसार जी आज गावाची पोखरलेली अवस्था झाली आहे. सगळे लुटारूच सगळीकडे उभे आहेत. असच एकूण चित्र आपल्याला कुठल्याही गावात गेलं तरी दिसतं. गावच्या विकासाचा कुठलाही वचननामा हा लुटीचा वचननामा असतो. असच लेखकाला वरील विवेचनातून सांगायचं आहे. गावापासून ते बँक, तालुका, जिल्हा, राज्य यांची लुटालूट ही महालूत भरल्यासारखीच आहे. ही महालूट नसून ती महालूत आहे. लुटण्याची लूत भरलेले लोकच सभोवती आहेत. त्यात आडव्याप्पा सारख्या शेतकऱ्यांची मोठीच शोकांतिका आपल्यासमोर उभी राहते. लेकखकाच्या वरील नोंदीतील स्वगतानुसार आपल्याला काही गोष्टी जर नजरेखालून घालायच्या असतील, तर आजच्या समकालीन वास्तवावर तो नेमकं बोट ठेवतो. ते इतकं नेमकं आहे की, लेखकाने वर्णन केलेलं वास्तव तसूभरही खोटं नाहीये.

अशा अनेक नोंदी, पटकथा, पटकथेतील दृश्ये, कॅमेरा आणि सर्वात प्रभावी म्हणजे जोतिराव फुले आणि कांतारामजींना लिहिलेली पत्रे. हे या कादंबरीचं मुख्य बलस्थान म्हणावं लागेल. मराठीत असे प्रयोग अत्यंत विरळ असेच आहेत. कादंबरीच्या अंतर्गत पटकथा, पात्रे, स्थळं, त्यांचं चित्रीकरण या सगळया गोष्टी कादंबरीकाराच्या गंभीरपणाला आपल्या आशयाच्या माध्यमातून वाचकांच्या पुढ्यात ठेवतात. काही पत्राद्वारे लेखक जोतीरावांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात की, "तुम्हाला सांगितले तर पटणार नाही, आज जवळ - जवळ सगळया शिक्षणसंस्था बहुजन समाजाच्या. त्यात शिकवणारे बहुतेक शिक्षक बहुजन समाजाचे. या शाळा तपासणारे, शाळांना मंजुरी देणारे,

पगार करणारे, सगळेच्या सगळे नसतील, पण बहुतेक बहुजन समाजाचे ही तुम्हाला संतोष देणारी गोष्ट हे ऐकून तुमचा ऊर भरून आला असेल. वास्तविक ही मोठीच कामगिरी तुमच्यामुळे शक्य झाली याचे श्रेय तुमचेच. यामुळे बऱ्याच गोष्टी चांगल्या घडल्या. त्याचीही नोंद मला देता येईल. पण ती देणार नाही. यात तुम्हाला दुखावण्याचा उद्देश नाही. "(ब-बळीचा ,पृ.१२८) शिक्षण हे बहुजन समाजासाठी किती महत्त्वाचे होते. जोतिरावांनी त्यासाठी किती खस्ता खाल्ल्या, त्यासाठी किती संघर्ष केला. या गोष्टी सर्वज्ञात आहेत. परंतु आज याच बहुजन समाजाची नाडवणूक त्याच समाजातील शिकलेले लोक करतात. त्यांच्याच ताब्यात सर्व गोष्टी आहेत. पूर्वी ब्राह्मण समाज जातिव्यवस्थेत वरच्या स्थानी किंवा ज्ञानाची सर्व साधने त्याच्या ताब्यात असल्यामुळे बहुजनांची पिळवणूक करत होता. असे आपण कालपर्यंत म्हणत होतो. आज ज्ञानाची साधने व संस्था या सगळया गोष्टी बहुजन समाजाच्याच ताब्यात आहेत. असे असूनही तेच आपल्या समाजाचे शोषण करताहेत. ही किती मोठी लाजीरवाणी गोष्ट म्हणायची या सगळयाचा जोतिरावांना किती मोठा पश्चात्ताप होत असेल. हे लेखकाला माहीत असल्याने तो खेदाने किंवा उपहासाने आपल्या पत्रात लिहितो आहे की, 'वास्तविक ही मोठीच कामगिरी' असे म्हणून तो आपल्यातील अस्वस्थता इथे व्यक्त करतो आहे.

हाच शिक्षणाचा प्रश्न पुढे जोडत लेखक आपल्या आणखी एका पत्रात जोतीरावांना म्हणतो की, " जोतीराव, शेतकऱ्याच्या मुलाला कसे शिक्षण द्यावे याबाबत तुम्ही तुमच्या ग्रंथात लिहिले होते. शेतकऱ्याच्या मुलाला श्रम आणि शिक्षण एकत्रित दिले पाहिजे. ते कुणीच ध्यानात घेतले नाही. इंग्रजांना ते परवडणारे नव्हते आणि स्वातंत्र्यानंतर इंग्रजांचेच शिक्षण पुढे चालू ठेवणाऱ्या आमच्या मायबाप सरकारला तुम्ही काय म्हटले होते, हे माहितच नव्हते . त्यामुळे सतत १० + २ + ३ असा सगळा खेळ नाही कळले ? म्हणजे एकदा मराठी शाळेचा वर्ग हायस्कूलला जोडायचा. एकदा हायस्कूलचा वर्ग मराठी शाळेला जोडायचा. झाले शैक्षणिक धोरण, बाकी कशाचा कशाला पत्ता नाही. कधी म्हणायचे पाचवीपासून इंग्रजी, कधी म्हणायचे पहिलीपासून इंग्रजी. शिकवायचे कुठेच नाही. (ब-बळीचा, पृ.१४८) अशा अर्थाने जो काही खेळखंडोबा उभा राहिला आहे. त्याची जाणीव लेखक आपल्या पत्राद्वारे जोतिरावांना सांगत असला तरीही तो ते वाचकाला सांगत आहे. जोतिरावांनी जो संघर्ष इथल्या व्यवस्थेविरूद्ध उभा केला होता, त्याचे काय झालं ? आपण कुठल्या अवस्थेपर्यंत सध्या पोहोचलो आहोत ? पूर्वी ज्याच्या हातात ज्ञानाची साधने होती, तो जातसमूह ज्या पद्धतीने सर्व गोष्टी अत्यंत हेतूपूर्वक घडवून आणत होता. तेच धोरण पूर्वी पिळवणूक झालेला कालचा समाज आज आपल्याच बांधवांच्या विरोधात करत आहे. कृतिआधारित शिक्षणाची किंवा प्रत्यक्ष कागदी शिक्षणाला टाळून जे मानवाच्या रोजच्या गरजांचे किंवा मानवी पर्यावरणामध्ये सातत्याने प्रगती करणारे धोरण आताच्या शिक्षणात दिसून येत नाही. किंवा केवळ इयत्ता लोटत लोटत विद्यार्थ्यांना पुढे आणायचे आणि त्याला शिक्षण म्हणायचे. असाच काही उद्देश या शिक्षणाचा आहे. वर्गाला वर्ग जोडत नेत केवळ शिक्षणाचे आगगाडीसारखे डबे जोडायचे. हीच एकमेव गोष्ट उरते आहे. जोतिरावांच्या शिक्षणपद्धतीच्या अनुषंगाने तो विचार अमलात येत नाही. ही मुख्य लेखकाची तक्रार आहे .

सद्सदविवेक व माणुसकी शिल्लक असलेल्या आजच्या सर्वसामान्य माणसाच्या मनातील अनेक कलह या

कादंबरीत येतात. या कादंबरीतील नायक हा गावगाड्यातील आहे. तो कृषीसंस्कृतीशी निगडीत आहे. त्यामुळे त्याच्या आत चाललेले आक्रंदन हे अधिक आहे. काही ठिकाणी अशी वाक्ये आहेत की त्याने आपण अधिक गंभीर होतो. उदा. "परंपरागत बियाणे गेली . नवी फसवणूक दारी आली ...... जे जे बोगस ते ते खपवण्याचे हक्काचे ठिकाण म्हणजे शेतकरी. "(ब-बळीचा,पृ.२१३) मराठी ग्रामीण साहित्यात काही महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. त्यांपैकी 'ब - बळीचा' ही एक होय. काही अभ्यासकांना ग्रामीण साहित्यातील गंभीरपणाबाबत जरा शंका असते. किंवा चिंतनाचा आभाव जाणवतो. त्यांनी ही कादंबरी वाचणं गरजेचं आहे. अर्थात असे आरोप हे अत्यंत बिनबुडाचे असेच आहेत. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर या कादंबरीकडे आपण कुठल्या दृष्टीकोनातून पाहू शकतो ? हे जर आपण येथे लक्षात घेतले, तर आपल्याला समजेल अशा अनुषंगाने मांडणी करताना दिगंबर पाध्ये म्हणतात, "आधुनिक जगण्यातली विसंगती दर्शवणाऱ्या अशा असंख्य गोष्टी या कादंबरीत आले आहेत परंतु पारंपरिक जगण्यातील भावनात्मक संबंध व सरळपणा याबाबी वगळता पारंपारिक जगण्याचे अवाजवी उदात्तीकरण फारसे केलेले नाही."५ आजची स्थिती ज्यांना फायद्याची आहे, त्यांना निश्चितच जागतिकीकरण हे त्यांच्या बाजूने योग्यच वाटणार. पण मुळापासून उद्ध्वस्त करण्याचं तत्त्वज्ञान हे निसर्गनियमाच्या विरोधातील असच आहे. कारण जिथे जिथे जागतिकीकरणाची चाहूल लागली तिथे तिथे ओरबाडून घेणं आलच. जागतिकीकरणाच्या आगमनानंतर निसर्गाकडून जितकं घेतलं गेलं तितकं निसर्गाला काय दिलं गेलं ? हा साधा प्रश्न आपण येथे उपस्थित केला, तर आपल्याला असे उत्तर येते की 'काहीच नाही' म्हणजे अतियांत्रिकीकरणानंतर केवळ थोडेफार रोजगाराचे प्रश्न सुटले असतीलही, पण त्या बदल्यात जी पिळवणूक झाली ती कुठेही भरून येणारी अशी नाहीच आहे. तेव्हा हे सगळं शेती व निसर्गाच्या शोषणासाठीच उभं राहिल्याचं जाणवंत. आणि यात सर्वात मोठा बळी हा शेतकरीच आहे. म्हणून या कादंबरीचे शिर्षक ' ब - बळीचा ' हे या दृष्टीकोनतून महत्त्वाचे वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळात शासन स्तरावर म्हणा किंवा काही कर्मयोगी लोकांच्या प्रयत्नांमुळे म्हणा शिक्षणाच्या सुविधा गावखेड्यापर्यंत उपलब्ध झाल्या. या शिक्षणाच्या माध्यमातून शेतकरी घरातील अनेक मुलं शिक्षण घेऊन विविध महत्त्वाच्या पदावर विराजमान झाली. काही मुलं अनेक उच्च पदावर पोहोचली. परंतु अचानक आलेल्या भौतिक स्थितीमुळे किंवा मूळांशी तुटलेल्या नाळेमुळे म्हणा किंवा थोड्याशा शहरीकरणाच्या वा साहेबीकरणाच्या थाटामुळे ते आपल्या भूमितत्त्वाला विसरली. आदी वकील, डॉक्टर, इंजिनियर तसेच विविध सरकारी खात्याच्या पदांवर ती कार्यरत झाली. ज्या लोकांनी पोटाला चिमटा घेऊन आपल्यासाठी ही शिक्षणव्यवस्था उभी केली, ज्या लोकांमुळे आपण हे शिक्षण घेऊ शकतो, त्या सर्वांना ती विसरली. याउलट तलाठी, तहसिलदार, कलेक्टर, पोलीस आदी महत्त्वाच्या पदांवर जाऊन आपल्याच शेतकरी समाजाला अडचणीत आणू लागली. एकमेकांना साह्य करणारी शेतीपरंपरा ते विसरले आणि अधिक भांडवलवादी जगाच्या आहारी गेले. गावगाड्यात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला या ना त्या कारणामुळे तलाठी अथवा अशाच प्रकारच्या अन्य सरकारी कर्मचाऱ्यांकडे जावे यावे लागतेच लागते. तिथे त्याच्या प्रश्नांना अथवा अडचणींना लक्षात न घेता त्याची चिरीमिरीसाठी नाडवणूक केली जाऊ लागलो. यातून एक नवी शोषणव्यवस्था उभी राहिली आणि हीच शेतकरी घरातील मुलं ज्या शासकीय स्थानावर गेली तिथून

ते आपला बॅकबॅलन्स वाढवू लागली. साध्या साध्या तलाठ्याच्या श्रीमंतीचं दर्शन जरी आपण घेतलं तरी ते एखाद्या दहापंधरा एकरची मालकी असलेल्या शेतकऱ्याच्याही वरचढ असच असेल. इतकी ती श्रीमंती डोळे फाडणारी आहे. आणि ही शेतकऱ्यासाठी रोजचीच नित्याची गोष्ट झालेली आहे. हेच लेखकाचं मोठं दुःख या कादंबरीच्या माध्यमातून आपल्या समोर येतं आहे.

अर्थात आपण असा विचार करतो की, शेतकरी समाजातील सर्वच शिकलेली मुलं वाईट वगैरे आहेत का ? तर सरसकट आपण तसा विचार करू शकत नाहीत. परंतु एका व्यवस्थेचा भाग असलेली ही मुलं आहेत. आणि ती आपल्याच शेतकरी घरातील असल्याचे लेखकाचे दुःख आहे. लेखकाचं आणखी एक महत्त्वाचं म्हणणं आहे की, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी ज्या काही चळवळी उभ्या राहिल्या, त्या सर्वांनी शेतकऱ्यांच्या जगण्याचे त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे प्रश्न मांडले. परंतु ते कुठल्या शेतकऱ्यांच्या दुःखाचे प्रश्न होते ? तर ते बागायती अथवा नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न होते. कोरडवाहू अथवा गरीब शेतकऱ्यांचे प्रश्न कोण मांडणार होते ? पावसाच्या भरवश्यावर पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचे ते प्रश्न नव्हते. या शेतकरी संघटना म्हणजे केवळ राज्यातल्या एका कोपऱ्यातल्या किंवा काही जिल्ह्यांपुरत्या मर्यादित अशा शेतकऱ्यांच्या संघटना होत्या काय ? याचाही विचार या कादंबरीच्या निमित्ताने लेखक करतो. हे लेखकाने लिहिलेल्या अनेक पत्रांतून आपल्या समोर येत राहते.

याच विमनस्क अथवा उद्ध्वस्त मनस्थितीतून लेखक महात्मा जोतिबा फुल्यांनाही पत्रे लिहितो. महात्मा फुल्यांनी जी काही महत्त्वाची समाजक्रांतिकारक कामे केली आहेत, तिच्यापैकी एक महत्त्वाचे कार्य शेतकऱ्यांसाठीही केले आहे. फुल्यांनी शेतकऱ्यांसंदर्भात दोनेकशे वर्षापूर्वी जे काही प्रश्न मांडले आहेत, त्याची आजही गरज आहे. त्या दृष्टीने लेखकाला जोतिरावांचे कार्य ऐतिहासिक न वाटले तर नवलच ! म्हणून लेखक कोणकेरीच्या माध्यमातून जोतिरावांना पत्र लिहितो. त्या लिहिलेल्या प्रत्येक पत्रातून आपल्याला कोणकेरीची अस्वस्थता सतत जाणवत राहते. या पत्रांतून आजच्या समकाळातील एक अत्यंत वाईट वास्तव आपल्या समोर उभं राहतं. या पत्रांच्या माध्यमातून लेखकाची असलेली सततची तगमग इथे अधोरेखित होते. कादंबरीच्या निवेदना संदर्भात मांडणी करताना रमेश वरखेडे म्हणतात, "श्रद्धा, मूल्य यांचीही उलटापालट मांडणारे निवेदन तंत्र या कादंबरीच्या संवेदनमूल्यांची तीव्रता वाढवायला सहाय्यभूत होते. जुन्या संहिताचे संदर्भ उजळुन वर्तमानातल्या विसंगती ठसठशीतपणे पुढे आणण्यासाठी अंतरसंहितात्मकतेचा वापर केल्यामुळे पूर्वकालीन महाकथने आणि उत्तरकालीन लघुकथन यांतील सातत्य आणि परिवर्तन यांचा मेळ साधण्याचे ऐतिहासिक कार्य आपोआपच साध्य झाले आहे."[६] ही कादंबरी वा पत्रे कुठल्याही शेतकरी व्यक्तीने जरी वाचली तरी आपल्याला त्याची तगमगच इथे दिसेल. इतकी ही सगळी पत्रे सर्वांच्या मनाचा ठाव घेणारी व सत्य परिस्थिती विशद करणारी वाटतात. लेखक इथे उलटतपासणी करताना दिसतो. महात्मा फुल्यांचा त्या काळातील संघर्ष हा ब्राह्मणी लोकांशी होता. बहुजन समाजाच्या अज्ञानामुळे त्यांना ही ब्राह्मणांची गुलामी सहन करावी लागतेय. याची जाणीव फुल्यांना होती . म्हणून त्यांनी त्या काळात सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून याविरुद्ध मोठा संघर्ष केला. परंतु आता त्याची उलट पुनरावृत्ती होतेय. हे लेखक आपल्याला कादंबरीच्या अनेक घटना प्रसंगांच्या माध्यमातून सांगतो आहे.

या कादंबरीच्या माध्यमातून लेखक जो कही प्रश्न उभे करतो. ते महत्त्वाचेच आहेत. परंतु हा जो काही शेती, शेतकरी यांच्या शोषणाचा लढा आहेत, तो केवळ एक व्यवस्था म्हणून पाहून चालणारा नाही. त्याचा एकमेकांच्या शोषणाशी संबंध जोडून पाहणे महत्त्वाचे आहे. आणि तो शोध लेखक दिपूशेठ, कोणकेरी, आडव्याप्पा यांच्या माध्यामातून घेतो आहे. यांचा परस्परसंबंध या कादंबरीच्या माध्यमातून आपण पाहिला आहेच. म्हणून 'ब - बळीचा' या कादंबरीचा आपल्याशीही तितकाचा संबंध आहे.

**संदर्भ :**


१. बाबर अशोक, ब-बळीचा: एक भारतीय पेच, शरयू आसोलकर (संपा.) ब- बळीचा विषयी, दर्या प्रकाशन पुणे, २०१५ पृ. ६९

२. रिंढे नितीन, ब- बळीचा, राजन गवस, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२

३. कदम महेंद्र, प्रयोगाच्या विविध शक्यता शोधणारी कादंबरी, शरयू आसोलकर (संपा.) ब-बळीचा विषयी , दर्या प्रकाशन पुणे,२०१५ पृ.१३३

४. लोमटे आसाराम, गावाच्या उदध्वस्ती करण्याची गोष्ट : ब-बळीचा, शरयू आसोलकर (संपा.) ब- बळीचा विषयी, दर्या प्रकाशन पुणे, २०१५ पृ.८६

५. पाध्ये दिगंबर, ब- बळीचा: कादंबरीबद्दल, शरयू आसोलकर (संपा.) ब- बळीचा विषयी, दर्या प्रकाशन पुणे,२०१५ पृ.४५

६. वरखेडे रमेश, ब- बळीचा: विमर्शक कादंबरीचा अनोखा प्रयोग, शरयू आसोलकर (संपा.) ब- बळीचा विषयी, दर्या प्रकाशन पुणे, २०१५ पृ.२८